ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम
सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्याबाबत.

अपलोड

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००७/प्र.क्र.१३९/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई- ४० ०३२, दिनांक : १० डिसेंबर, २००७**

वाचा: १) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्रमांक:ग्रापापु१००३/प्र.क्र.२५६/ पापु-०७, दिनांक १० जुलै २००६.
२) शासन निर्णय समक्रमांक, दि.२७ नोव्हेंबर,२००७.

**शासन निर्णय:**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नैसर्गिक परिस्थितीमुळे दूरवरुन पाणी आणावे लागल्याने होणाऱ्या देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान देण्याबाबतचे आदेश संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठीचे प्रस्ताव जिल्हा परिषदांकडून मागविण्यात आलेले आहेत. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये ज्या जिल्हा परिषदांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत, अशा जिल्हा परिषदांना पहिला हप्ता म्हणून रु.२८७८.०० लक्ष अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

२. सर्व जिल्हा परिषदांकडून अद्यापही प्रस्ताव प्राप्त झालेले नसल्याने व त्यामुळे माहराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात येत असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांना अनुदान उपलब्ध होण्यात येत असलेल्या अडचणी विचारात घेऊन, एक **विशेष बाब** म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी उपलब्ध असलेल्या एकुण निधी पैकी रु.५००.०० लक्ष अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वितरित करण्यास पुढील अटी व शर्तींच्या आधारे शासन मंजूरी देत आहे.

(१) सदर अनुदान संबंधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आहरीत करुन ते स्वतंत्र खाती ठेवावे.
(२) या अनुदानातून ज्या योजनांसाठी निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. त्या योजनांची यादी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. तोपर्यंत सदर अनुदानातून खर्च करु नये.

३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी राज्यस्तरावर उपलब्ध असलेल्या निधीतून रु.५००.०० लक्ष इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास मुक्त करण्याची कार्यवाही या विभागाच्या कार्यासन पापु-०४ / पापु-१० मार्फत करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७१२१०१३२२१९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(श्री. श्री. घोलप)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
४) विभागीय आयुक्त (सर्व)
५) सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई.
६) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७) जिल्हाधिकारी (सर्व)
८) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
९) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
११) प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्यक व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, दुसरा मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१४) उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१५) उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
१६) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
१७) अवर सचिव, कार्यासन पापु-०४ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१८) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व नियंत्रण अधिकारी व कार्यासन अधिकारी.
१९) संगणक कक्ष
२०) निवडनस्ती (पापु-०७)